महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक:सीएमए-४०२३/प्र.क्र.१६०/२०२३/जाहिरात दिनांक: २१ मार्च, २०२४

-: प्रसिध्दीपत्रक :-

विषय : महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ तसेच समाज कल्याण अधिकारी, गट-ब आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट ब - चाळणी परीक्षा

संदर्भ :(१) जाहिरात क्रमांक-४१४/२०२३, ०२४/२०२३ आणि १३३/२०२३
(२) आयोगाचे प्रसिध्दीपत्रक दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४
(३) महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षण अधिनियम, २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४
(४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी २०२४/प्र.क्र.७५/१६-क, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४

आयोगातर्फे आयोजित दिनांक २८ एप्रिल, २०२४ रोजी होणारी महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ तसेच दिनांक १९ मे, २०२४ रोजी होणारी समाज कल्याण अधिकारी, गट-ब आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब या सरळसेवा चाळणी परीक्षा पुढे ढकलण्यात येत असून परीक्षांच्या सुधारित तारखा यथावकाश जाहीर करण्यात येतील. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता अधिनियम, २०२४ मधील आरक्षणाच्या तरतूदी विचारात घेता, शासनाकडून सुधारित आरक्षण निश्चिती प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त नमूद परीक्षांच्या बाबतीतील पुढील घोषणा आयोगातर्फे करण्यात येईल.

उप सचिव (जाहिरात),
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई.

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : सीएमए-४०२३/सीआर-१६०/२०२३/जाहिरात दिनांक :- ०८ मे, २०२४

-: शुद्धिपत्रक :-

महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४
(जाहिरात क्रमांक ४१४/२०२३, दिनांक २९ डिसेंबर, २०२३)

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करीता दिनांक २९ डिसेंबर, २०२३ रोजी एकूण २७४ रिक्त पदांकरीता जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून जाहिरातीनुसार सदर परीक्षा दिनांक २८ एप्रिल, २०२४ रोजी घेण्याचे नियोजित होते. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ अनुसार राज्याच्या नियंत्रणाखालील पदांवरील नियुक्तीकरीता सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षणाची तरतूद विहित करण्यात आली असून सदर अधिनियमातील तरतुदी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी २०२४/प्र.क्र.७५/१६-क, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अनुसार विषयांकित संवर्गाच्या विज्ञापित जाहिरातीकरीता लागू आहेत. प्रस्तुत प्रकरणी सामाजिक व शैक्षणिक शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण निश्चिती करून सुधारित मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनास कळविण्यात आले. यास्तव, आयोगाच्या दिनांक २१ मार्च, २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रस्तुत परीक्षा पुढे ढकलण्यात आली असल्याचे जाहीर करण्यात आले होते. सदर परीक्षा सुधारित दिनांकास म्हणजेच **शनिवार, दिनांक ०६ जुलै, २०२४** रोजी आयोजित करण्यात येईल. शासनाकडून प्राप्त सुधारित मागणीपत्रानुसार **महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४** परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गातील एकूण **५२४** पदांचा सुधारित तपशील खालीलप्रमाणे आहे :-

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व	वि.मा.प्र.	सा. आणि शै. मागास वर्ग	आ.दु.घ.	एकूण आरक्षित पदे	अराखीव पदे	एकूण पदे
(एक) राज्य सेवा परीक्षा :- एकुण पदे ४३१													
(१) उप जिल्हाधिकारी, गट-अ (एकूण ०७ पदे)													
पदसंख्या	--	१	--	--	--	१	--	१	१	१	५	२	७
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	--	--	--	--	--	१	--	१	१	१	४	१	५
(२) महिला	--	१	--	--	--	--	--	--	--	--	१	१	२
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
(४) दिव्यांग	--												
(५) अनाथ	--												
(२) सहाय्यक राज्य कर आयुक्त, गट-अ (एकूण ११६ पदे)													
पदसंख्या	९	६	३	२	४	२	२७	२	१२	१२	७९	३७	११६
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	५	४	२	१	३	२	१८	२	७	७	५१	२४	७५
(२) महिला	३	२	१	१	१	--	८	--	४	४	२४	११	३५
(३) खेळाडू	१	--	--	--	--	--	१	--	१	१	४	२	६
(४) दिव्यांग	**एकूण ०५ पदे-** [०२ पदे अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision), ०१ पद - कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing), ०१ पद - अस्थिव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy), ०१ पद- स्वमग्नता (Autism) / मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability) / मानसिक आजार (Mental Illness) तसेच बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व]												
(५) अनाथ	एकूण ०१ पद – संस्थात्मक												
(३) गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी),गट-अ (एकूण ५२ पदे)													
पदसंख्या	७	५	२	१	१	१	११	१	५	५	३९	१३	५२
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	५	३	१	१	१	१	७	१	३	३	२६	८	३४
(२) महिला	२	२	१	--	--	--	३	--	२	२	१२	४	१६
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--	१	--	--	--	१	१	२
(४) दिव्यांग	**एकूण ०२ पदे** – [०१ पद - अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision), ०१ पद - अस्थिव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy)												
(५) अनाथ	**एकूण ०१ पद - संस्थात्मक**												

(४) सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ (एकूण ४३ पदे)													
प्रवर्ग	**अ.जा.**	**अ.ज.**	**वि.जा. (अ)**	**भ.ज. (ब)**	**भ.ज. (क)**	**भ.ज. (ड)**	**इ.मा.व**	**वि.मा.प्र.**	**सा. आणि शै. मागास वर्ग.**	**आ.दु.घ.**	**एकूण आरक्षित पदे**	**अराखीव पदे**	**एकूण पदे**
पदसंख्या	९	३	३	१	३	--	१०	१	४	४	३८	५	४३
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	५	२	२	१	२	--	६	१	३	३	२५	३	२८
(२) महिला	३	१	१	--	१	--	३	--	१	१	११	२	१३
(३) खेळाडू	१	--	--	--	--	--	१	--	--	--	२	--	२
(४) दिव्यांग		**एकूण ०२ पदे (०१ पद** - अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision), **०१ पद** - कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing)											
(५) अनाथ		--											

(५) सहायक आयुक्त/ प्रकल्प अधिकारी (एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प)(श्रेणी दोन), गट-अ (एकूण ०३ पदे)													
प्रवर्ग	**अ.जा.**	**अ.ज.**	**वि.जा. (अ)**	**भ.ज. (ब)**	**भ.ज. (क)**	**भ.ज. (ड)**	**इ.मा.व**	**वि.मा.प्र.**	**सा. आणि शै. मागास वर्ग.**	**आ.दु.घ.**	**एकूण आरक्षित पदे**	**अराखीव पदे**	**एकूण पदे**
पदसंख्या	--	१	--	१	--	--	--	--	--	--	२	१	३
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	--	१	--	--	--	--	--	--	--	--	१	१	२
(२) महिला	--	--	--	१	--	--	--	--	--	--	१	--	१
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
(४) दिव्यांग	--												
(५) अनाथ	--												

(६) उद्योग उप संचालक (तांत्रिक), गट-अ (एकूण ०७ पदे)													
प्रवर्ग	**अ.जा.**	**अ.ज.**	**वि.जा. (अ)**	**भ.ज. (ब)**	**भ.ज. (क)**	**भ.ज. (ड)**	**इ.मा.व .**	**वि.मा.प्र.**	**सा. आणि शै. मागास वर्ग.**	**आ.दु.घ.**	**एकूण आरक्षित पदे**	**अराखीव पदे**	**एकूण पदे**
पदसंख्या	२	--	--	--	--	--	२	--	१	२	७	--	७
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	१	--	--	--	--	--	१	--	१	१	४	--	४
(२) महिला	१	--	--	--	--	--	१	--	--	१	३	--	३
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--		--	--	--	--	--	--
(४) दिव्यांग	**एकूण ०१ पद** - अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision),												
(५) अनाथ	--												

(७) सहायक कामगार आयुक्त, गट - अ (एकूण ०२ पदे)													
प्रवर्ग	**अ.जा.**	**अ.ज.**	**वि.जा. (अ)**	**भ.ज. (ब)**	**भ.ज. (क)**	**भ.ज. (ड)**	**इ.मा.व .**	**वि.मा.प्र.**	**सा. आणि शै. मागास वर्ग.**	**आ.दु.घ.**	**एकूण आरक्षित पदे**	**अराखीव पदे**	**एकूण पदे**
पदसंख्या	--	--	--	--	--	--	१	--	--	१	२	--	२
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	--	--	--	--	--	--	१	--	--	१	२	--	२
(२) महिला	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
(४) दिव्यांग	--												
(५) अनाथ	--												

(८) सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, गट - अ (एकूण ०१ पद)													
प्रवर्ग	**अ.जा.**	**अ.ज.**	**वि.जा. (अ)**	**भ.ज. (ब)**	**भ.ज. (क)**	**भ.ज. (ड)**	**इ.मा.व .**	**वि.मा.प्र.**	**सा. आणि शै. मागास वर्ग.**	**आ.दु.घ.**	**एकूण आरक्षित पदे**	**अराखीव पदे**	**एकूण पदे**
पदसंख्या	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	१	१
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	१	१
(२) महिला	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
(४) दिव्यांग	--												
(५) अनाथ	--												

(९) मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी, गट-ब (एकूण १९ पदे)													
प्रवर्ग	**अ.जा.**	**अ.ज.**	**वि.जा. (अ)**	**भ.ज. (ब)**	**भ.ज. (क)**	**भ.ज. (ड)**	**इ.मा.व.**	**वि.मा.प्र.**	**सा. आणि शै. मागास वर्ग.**	**आ.दु.घ.**	**एकूण आरक्षित पदे**	**अराखीव पदे**	**एकूण पदे**
पदसंख्या	४	२	१	--	--	१	४	--	२	२	१६	३	१९
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	३	१	१	--	--	१	३	--	१	१	११	२	१३
(२) महिला	१	१	--	--	--	--	१	--	१	१	५	१	६
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
(४) दिव्यांग		**एकूण ०१ पद** - अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision)											
(५) अनाथ		--											

(१०) सहायक गट विकास अधिकारी, गट-ब (एकूण २५ पदे)													
प्रवर्ग	**अ.जा.**	**अ.ज.**	**वि.जा. (अ)**	**भ.ज. (ब)**	**भ.ज. (क)**	**भ.ज. (ड)**	**इ.मा.व.**	**वि.मा.प्र.**	**सा. आणि शै. मागास वर्ग.**	**आ.दु.घ.**	**एकूण आरक्षित पदे**	**अराखीव पदे**	**एकूण पदे**
पदसंख्या	४	१	१	--	--	--	९	२	३	२	२२	३	२५
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	३	१	१	--	--	--	६	१	२	१	१५	२	१७
(२) महिला	१	--	--	--	--	--	३	१	१	१	७	१	८
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
(४) दिव्यांग		**एकूण ०१ पद** – अस्थिव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy)											
(५) अनाथ		--											

(११) सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब (एकूण १ पदे)													
प्रवर्ग	**अ.जा.**	**अ.ज.**	**वि.जा. (अ)**	**भ.ज. (ब)**	**भ.ज. (क)**	**भ.ज. (ड)**	**इ.मा.व.**	**वि.मा.प्र.**	**सा. आणि शै. मागास वर्ग.**	**आ.दु.घ.**	**एकूण आरक्षित पदे**	**अराखीव पदे**	**एकूण पदे**
पदसंख्या	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	१	१
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	१	१
(२) महिला	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
(४) दिव्यांग													
(५) अनाथ		--											

(१२) उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब (एकूण ५ पदे)													
प्रवर्ग	**अ.जा.**	**अ.ज.**	**वि.जा. (अ)**	**भ.ज. (ब)**	**भ.ज. (क)**	**भ.ज. (ड)**	**इ.मा.व.**	**वि.मा.प्र.**	**सा. आणि शै. मागास वर्ग.**	**आ.दु.घ.**	**एकूण आरक्षित पदे**	**अराखीव पदे**	**एकूण पदे**
पदसंख्या	--	--	१	--	--	--	२	--	१	१	५	--	५
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	--	--	१	--	--	--	१	--	१	१	४	--	४
(२) महिला	--	--	--	--	--	--	१	--	--	--	१	--	१
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
(४) दिव्यांग		--											
(५) अनाथ		--											

(१३) कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता-मार्गदर्शन अधिकारी, गट-ब (एकूण ०७ पदे)													
प्रवर्ग	**अ.जा.**	**अ.ज.**	**वि.जा. (अ)**	**भ.ज. (ब)**	**भ.ज. (क)**	**भ.ज. (ड)**	**इ.मा.व.**	**वि.मा.प्र.**	**सा. आणि शै. मागास वर्ग.**	**आ.दु.घ.**	**एकूण आरक्षित पदे**	**अराखीव पदे**	**एकूण पदे**
पदसंख्या	--	--	--	--	--	--	२	--	१	१	४	३	७
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	--	--	--	--	--	--	१	--	१	१	३	२	५
(२) महिला	--	--	--	--	--	--	१	--		--	१	१	२
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--	--	--		--	--	--	--
(४) दिव्यांग		**एकूण ०१ पद** - अस्थिव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy)											
(५) अनाथ		--											

(१४) सरकारी कामगार अधिकारी, गट - ब (एकूण ०४ पदे)

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.	वि.मा.प्र.	सा. आणि शै. मागास वर्ग.	आ.दु.घ.	एकूण आरक्षित पदे	अराखीव पदे	एकूण पदे
पदसंख्या	१	१	--	--	--	--	--	--	--	२	४	--	४
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	१	१	--	--	--	--	--	--	--	१	३	--	३
(२) महिला	--	--	--	--	--	--	--	--	--	१	१	--	१
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
(४) दिव्यांग		--											
(५) अनाथ		--											

(१५) सहायक प्रकल्प अधिकारी/ सांख्यिकी अधिकारी/ प्रशासकीय अधिकारी/ संशोधन अधिकारी / गृहप्रमुख /प्रबंधक, गट-ब (एकूण ०४ पदे)

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.	वि.मा.प्र.	सा. आणि शै. मागास वर्ग.	आ.दु.घ.	एकूण आरक्षित पदे	अराखीव पदे	एकूण पदे
पदसंख्या	--	१	--	१	१	--	--	--	--	१	४	--	४
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	--	१	--	१	--	--	--	--	--	१	३	--	३
(२) महिला	--	--	--	--	१	--	--	--	--	--	१	--	१
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
(४) दिव्यांग		--											
(५) अनाथ		--											

(१६) उद्योग अधिकारी (तांत्रिक), गट-ब (एकूण ७ पदे)

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.	वि.मा.प्र.	सा. आणि शै. मागास वर्ग.	आ.दु.घ.	एकूण आरक्षित पदे	अराखीव पदे	एकूण पदे
पदसंख्या	--	--	१	--	--	--	--	--	१	१	३	४	७
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	--	--	१	--	--	--	--	--	१	१	३	३	६
(२) महिला	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	१	१
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
(४) दिव्यांग	**एकूण — ०१ पद** - अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision),												
(५) अनाथ	--												

(१७) सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), आदिवासी विकास आयुक्तालय, गट-ब (एकूण ५२ पदे)

पदसंख्या	७	४	१	१	२	१	१०	१	५	५	३७	१५	५२
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	४	३	१	१	१	१	६	१	३	३	२४	९	३३
(२) महिला	२	१	--	--	१	--	३	--	२	२	११	५	१६
(३) खेळाडू	१	--	--	--	--	--	१	--	--	--	२	१	३
(४) दिव्यांग	**एकूण ०२ पदे- [०१ पद** - - अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision), ०१ पद - कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing)]												
(५) अनाथ	एकूण ०१ पद - संस्थात्मक												

(१८) निरीक्षण अधिकारी (पुरवठा), गट-ब (एकूण ७६ पदे)

पदसंख्या	१०	५	२	२	३	२	१४	२	८	८	५६	२०	७६
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	६	३	१	१	२	१	९	१	५	५	३४	१३	४७
(२) महिला	३	२	१	१	१	१	४	१	३	३	२०	६	२६
(३) खेळाडू	१	--	--	--	--	--	१	--	--	--	२	१	३
(४) दिव्यांग	**एकूण — ०३ पदे [०१ पद** - अंध / अल्पदृष्टी (Blind / Low Vision), **०१ पद** - कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (Deaf / Hard Hearing), **०१ पद** - अस्थिव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy)/ कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy)												
(५) अनाथ	**एकूण ०१ पद [संस्थात्मक]**												

(दोन)...

(दोन) महाराष्ट्र वनसेवा परीक्षा - महसूल व वन विभाग (एकूण ४८ पदे)

(१) सहायक वनसंरक्षक, गट-अ, (एकूण ३२ पदे)

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.	वि.मा.प्र.	सा. आणि शै. मागास वर्ग	आ.दु.घ.	एकूण आरक्षित पदे	अराखीव पदे	एकूण पदे
पदसंख्या	२	४	२	--	--	--	११	--	३	३	२५	७	३२
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	१	३	१	--	--	--	७	--	२	२	१६	४	२०
(२) महिला	१	१	१	--	--	--	३	--	१	१	८	२	१०
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--	१	--	--	--	१	१	२
(४) दिव्यांग	--												
(५) अनाथ	--												

(२) वनक्षेत्रपाल, गट-ब, (एकूण १६ पदे)

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.	वि.मा.प्र.	सा. आणि शै. मागास वर्ग	आ.दु.घ.	एकूण आरक्षित पदे	अराखीव पदे	एकूण पदे
पदसंख्या	४	४	--	--	१	--	३	--	२	२	१६	--	१६
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	३	३	--	--	१	--	२	--	१	१	११	--	११
(२) महिला	१	१	--	--	--	--	१	--	१	१	५	--	५
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
(४)वनशास्त्र पदवी	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
(५) दिव्यांग	--												
(६) अनाथ	--												

(तीन) महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षा – मृद व जल संधारण विभाग (एकूण ४५ पदे)

(१) उपविभागीय जलसंधारण अधिकारी (स्थापत्य), गट-अ, (एकूण २३ पदे)

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.	वि.मा.प्र.	सा. आणि शै. मागास वर्ग	आ.दु.घ.	एकूण आरक्षित पदे	अराखीव पदे	एकूण पदे
पदसंख्या	१	१	१	--	१	१	२	३	२	४	१६	७	२३
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	--	१	१	--	१	१	१	३	२	४	१४	३	१७
(२) महिला	--	--	--	--	--	--	१	--	--	--	१	४	५
(३) खेळाडू	१	--	--	--	--	--	--	--	--	--	१	--	१
(४) दिव्यांग	--												
(५) अनाथ	--												

(२) जलसंधारण अधिकारी (स्थापत्य), गट-ब, (एकूण २२ पदे)

प्रवर्ग	अ.जा.	अ.ज.	वि.जा. (अ)	भ.ज. (ब)	भ.ज. (क)	भ.ज. (ड)	इ.मा.व.	वि.मा.प्र.	सा. आणि शै. मागास वर्ग	आ.दु.घ.	एकूण आरक्षित पदे	अराखीव पदे	एकूण पदे
पदसंख्या	१	--	--	१	--	१	२	४	२	--	११	११	२२
रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :-													
(१) सर्वसाधारण	१	--	--	१	--	१	१	४	२	--	१०	५	१५
(२) महिला	--	--	--	--	--	--	१	--	--	--	१	५	६
(३) खेळाडू	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	१	१
(४) दिव्यांग	एकूण ०१ पद स्वमग्नता (Autism) / मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability) / मानसिक आजार (Mental Illness) तसेच एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व												
(५) अनाथ	--												

२. शासन निर्णय दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशाच्या अनुषंगाने सदर मूळ जाहिरातीस अनुसरून अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील आरक्षणाचा लाभ घ्यावयाच्या असल्यास त्याबाबतचा विकल्प सादर करणे आवश्यक ठरते.

३. आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४ परीक्षेकरीता अर्जाद्वारे फक्त अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून अर्ज केलेल्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करण्याकरीता विकल्प सादर करणे तसेच अराखीव (खुला) मधील उमेदवार जे मूळ जाहिरातीकरीता **वयाधिक ठरल्याने** अर्ज सादर करू शकले नाहीत, अशा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील उमेदवारांकरीता नव्याने अर्ज सादर करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे :-

(१) संबंधित उमेदवार आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील "My Account" सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीकरीता (जा.क्र ४१४/२०२३) उपलब्ध करून देण्यात आलेल्या Link समोर दर्शविण्यात आलेल्या "Question" या बटनावर क्लिक करून विचारण्यात येणारी माहिती नमूद करून विकल्प सादर करू शकतील.

(२) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग दावा करण्याकरीता विकल्प सादर केल्यास संबंधित उमेदवाराचा मूळ अर्जातील दावा रद्द समजण्यात येईल.

(३) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गासाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करण्यासाठी विहित पद्धतीने तसेच विहित कालावधीत विकल्प सादर न करणाऱ्या उमेदवारांचा प्रस्तुत पूर्व परीक्षेकरीता यापूर्वी अर्ज सादर करताना केलेला दावा अंतिम समजण्यात येईल व सदर दावा बदलण्याची विनंती भरतीप्रकिये दरम्यान कोणत्याही टप्प्यावर मान्य करण्यात येणार नाही.

(४) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणामुळे मागासवर्गीयांकरीता अनुज्ञेय असलेल्या वयोमर्यादेतील सवलतीस अनुसरून नव्याने पात्र ठरणारे उमेदवार ऑनलाईन अर्जप्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईल मधील My Account सदराखाली प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीकरीता (जा.क्र ४१४/२०२३) उपलब्ध करून देण्यात आलेल्या Link च्या आधारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातून अर्ज सादर करू शकतील.

(5) संबंधित परीक्षेकरीता अर्जाद्वारे अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचा दावा केलेल्या उमेदवाराने सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग आरक्षणातून लाभ घेण्याकरीता विकल्प सादर करणे तसेच नव्याने अर्ज सादर करण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे करणे आवश्यक आहे :-

अ.क्र.	तपशील	विहित कालावधी
१	अर्ज सादर करण्याचा कालावधी	**दिनांक ०९ मे, २०२४ रोजी १४.०० ते दिनांक २४ मे, २०२४ रोजी २३:५९**
२	ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक	**दिनांक २४ मे, २०२४ रोजी २३:५९**
३	भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक	**दिनांक २६ मे, २०२४ रोजी २३:५९**
४	चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक	**दिनांक २७ मे, २०२४ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये**

४. महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ मधील सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), आदिवासी विकास आयुक्तालय, गट-ब संवर्गाकरीता कमाल वयोमर्यादा गणण्याची तारीख सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार **मूळ जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच दिनांक २५ जानेवारी, २०२४** अशी राहील.

५. महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करीता सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करण्यासाठी विकल्प सादर करणाऱ्या तसेच नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांचे जात प्रमाणपत्र सदर विकल्प सादर करण्या साठी विहित अंतिम दिनांकापूर्वीचे असणे आवश्यक आहे.

६. प्रस्तुत परीक्षेकरीता सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी सन २०२३-२०२४ अथवा २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात वैध असणारे उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे(NCL) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

७. प्रस्तुत परीक्षेच्या मूळ जाहिरातीमधील एकूण १६ संवर्गासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांच्या पात्रतेनुसार विकल्प घेण्यात आले. आता सदर शुद्धीपत्रकामध्ये नवीन ६ संवर्गाचा समावेश होत असल्याने मूळ जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची व तसेच शुद्धीपत्रकानुसार नव्याने अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांची एकूण २२ संवर्गासाठी पात्रता (वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, दिव्यांग सुनिश्चिती इत्यादी बाबी) मुख्य परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्याच्या टप्प्यावर पात्रतेनुसार विकल्प घेण्यात येईल.

८. उपरोक्त कार्यपद्धती सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने **मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्रमांक ३४६८/२०२४ तसेच इतर याचिकांवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.** महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२४ च्या मूळ जाहिरातीस व सदर शुद्धिपत्रकास आयोगाच्या दिनांक २६ एप्रिल, २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकातील तरतुदी लागू राहतील .

९. दिनांक २९ डिसेंबर, २०२३ रोजी प्रसिद्ध जाहिरात तसेच दिनांक २४ जानेवारी, २०२४ रोजी प्रसिद्ध शुद्धिपत्रकामधील इतर अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल नाही.

उपसचिव,(जाहिरात)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : सीएमए-०४२३/सीआर-१६०/२०२३/जाहिरात जाहिरात क्रमांक: ४१४/२०२३

महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतर्गत खालील संवर्गातील एकूण २७४ पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४, रविवार, दिनांक २८ एप्रिल, २०२४ रोजी महाराष्ट्रातील एकूण ३७ जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल :-

अ. क्र.	विभाग	संवर्ग	वेतनश्रेणी	एकूण पदे
१	सामान्य प्रशासन विभाग	राज्य सेवा	गट-अ व गट-ब संवर्गाच्या वेतन स्तरानुसार	२०५
२	मृद व जलसंधारण विभाग	महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा		२६
३	महसूल व वन विभाग	महाराष्ट्र वनसेवा सेवा		४३

२. अर्ज सादर करण्याची प्रक्रिया/कालावधी :-

अ.क्र.	तपशील	विहित कालावधी
१	अर्ज सादर करण्याचा कालावधी	दिनांक ०५ जानेवारी, २०२४ रोजी १४.०० ते दिनांक २५ जानेवारी, २०२४ रोजी २३:५९
२	ऑनलाईन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक	दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी २३:५९
३	भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक	दिनांक २८ जानेवारी, २०२४ रोजी २३:५९
४	चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक	दिनांक २९ जानेवारी, २०२४ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये

३. प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गातील सर्व पदांचा सविस्तर तपशील सोबतच्या **परिशिष्ट-एक** मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहे.

४. संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाधारे संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांकरीता स्वतंत्र मुख्य परीक्षा खालीलप्रमाणे आयोजित करण्यात येतील:-

अ.क्र.	परीक्षा	दिनांक
१	राज्य सेवा मुख्य परीक्षा - २०२४	दिनांक १४ ते १६ डिसेंबर, २०२४
२	महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा - २०२४	दिनांक २३ नोव्हेंबर, २०२४
३	महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा - २०२४	दिनांक २८ ते ३१ डिसेंबर, २०२४

५. जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून विहित पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

६. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-

६.१ भरावयाच्या उपरोक्त संवर्ग/पदांचा सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतचा तपशील शासनाच्या मागणीपत्रानुसार आहे. तसेच, वर नमूद केलेल्या पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

६.२ पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास त्याचा समावेश मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेमध्ये करण्यात येईल. तसेच याबाबतची घोषणा/सूचना वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा/सूचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

६.३ पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंतच्या कालावधीपर्यंत शासनाकडून सुधारित/अतिरिक्त मागणीपत्राद्वारे प्राप्त होणारी सर्व पदे पूर्व परीक्षेच्या निकालासाठी विचारात घेण्यात येतील.

६.४ जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंत नव्याने प्राप्त होणा-या मागणीपत्रांमध्ये जाहिरातीत नमूद नसलेल्या मागास प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाकरीता पदे उपलब्ध होण्याची आणि विद्यमान पदसंख्येमध्ये बदल/वाढ होण्याची शक्यता आहे. सदर बदललेली

पदसंख्या/अतिरिक्त मागणीद्वारे प्राप्त संवर्गातील पदे पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करताना विचारात घेतली जाईल. यास्तव पूर्व परीक्षेच्या जाहिरातीमध्ये पद आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंख्या कमी असल्यामुळे पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

६.५ विविध सामाजिक प्रवर्ग, महिला, प्राविण्यप्राप्त खेळाडू, अनाथ इत्यादींसाठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील

६.६ शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्रमांक-महिआ२०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२, दिनांक ०४ मे, २०२३ अन्वये विहित कार्यपद्धतीनुसार अराखीव महिलांकरीता आरक्षित पदावरील निवडीसाठी, अराखीव महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिलांनी नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे.

६.७ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित पदावरील निवडीसाठी दावा करू इच्छिणाऱ्या महिलांना संबंधित मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याबाबतच्या तरतुदी लागू राहतील.

६.८ महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून इतर सर्व मागास प्रवर्गातील महिलांसाठी नॉन-क्रिमिलेअरमध्ये मोडत असल्याबाबतचा स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

६.९ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती. (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

६.१० अर्ज करताना एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

६.११ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

६.१२ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ३१ मे, २०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

६.१३ शासन शुद्धिपत्रक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक, दिनांक ०९ मार्च, २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी कालावधी विचारात घेण्यात येईल.

६.१४ सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

६.१५ अराखीव (खुला)सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता गुणवत्तेच्या आधारे सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

६.१६ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधारण रहिवासी या संज्ञेला भारतीय लोकप्रतिनिधित्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

६.१७ सामाजिक अथवा समांतर आरक्षणाचा अथवा सोयी सवलतींचा दावा करणाऱ्या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहित नमुन्यातील पूर्व जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे. वैध प्रमाणपत्रांचा कालावधी संबंधित शासन आदेशावरील तरतुदीनुसार (लागू असेल त्याप्रमाणे) ग्राह्य समजण्यात येईल.

६.१८ सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

६.१९ खेळाडू आरक्षण :-

६.१९.१ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून, २०२२ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणासंदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

६.१९.२ प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

६.१९.३ खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

६.१९.४ पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे सक्षम क्रीडा प्राधिकरणाने निर्गमित केलेले क्रीडा प्रमाणपत्र सादर केले नसल्यास अथवा सदर प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी केलेल्या अर्जाची पोचपावती सादर केली नसल्यास , संबंधित उमेदवाराचा खेळाडूंकरीता आरक्षित पदावर विचार करण्यात येणार नाही.

६.१९.५ कागदपत्रे पडताळणी/मुलाखतीच्यावेळी खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारशी/नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

६.१९.६ एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

६.२० दिव्यांग आरक्षण :-

६.२०.१ दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

६.२०.२ प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणाऱ्या विविध संवर्ग/पदांकरीता दिव्यांग सुनिश्चिती संदर्भातील तपशील सोबतच्या **परिशिष्ट-दोन** प्रमाणे आहे.

६.२०.३ दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

६.२०.४ दिव्यांग व्यक्तींची संबंधित संवर्ग/पदाकरीता पात्रता शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

६.२०.५ दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदांवर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांची शिफारस करण्यात येईल.

६.२०.६ संबंधित दिव्यांगत्वाच्या प्रकारचे किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र धारक उमेदवार / व्यक्ती आरक्षण तसेच नियमानुसार अनुज्ञेय सोयी / सवलतीसाठी पात्र असतील.

६.२०.७ लक्षणीय दिव्यांगत्व असलेले उमेदवार / व्यक्ती खालील सवलतींच्या दाव्यास पात्र असतील:-

(१) दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद लक्षणीय दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित असल्यास नियमानुसार अनुज्ञेय आरक्षण व इतर सोयी सवलती

(२) दिव्यांगत्याचे प्रमाण किमान ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असल्यास तसेच पद संबंधित दिव्यांग प्रकारासाठी सुनिश्चित केले असल्यास नियमानुसार अनुज्ञेय सोयी-सवलती

६.२०.८ दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

६.२१. दिव्यांग उमेदवार :- लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत

६.२१.१ लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक : दिव्यांग२०१९/प्र.क्र.२००//दि.क.२, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२१ अन्वये जारी करण्यात आलेल्या ' **लक्षणीय (Benchmark)दिव्यांग व्यक्तींच्याबाबत लेखी परीक्षा घेण्याबाबतची मार्गदर्शिका-२०२१**' तसेच तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

६.२१.२ लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीसाठी केवळ अर्जाद्वारे दावा केला म्हणून सवलत अनुज्ञेय असणार नाही.

६.२१.३ प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या, पात्र दिव्यांग उमेदवारांना, लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन पध्दतीने आयोगास अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांसह विहित नमुन्यामध्ये आयोगाकडे लेखी विनंती करुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

६.२१.४ लेखनिकाची व्यवस्था उमेदवारांकडून स्वत: केली जाणार आहे की आयोगाच्या कार्यालयामार्फत लेखनिकाची व्यवस्था करावी लागणार आहे, याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जामध्ये असल्यासच विहित नमुन्याद्वारे प्राप्त लेखी विनंतीचा विचार केला जाईल.

६.२१.५ अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच आयोगाची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

६.२१.६ परीक्षेकरीता लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी दिलेल्या पात्र उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच लेखनिकाची मदत आणि/अथवा अनुग्रह कालावधीच्या परवानगीबाबत संबंधित उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत ई-मेलवर कळविण्यात येईल.

६.२१.७ प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी लेखनिक व अनुग्रह कालावधीचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करण्यापूर्वी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या **" दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना "** चे अवलोकन करणे उमेदवारांचे हिताचे राहील.

६.२२ अनाथ आरक्षण :-

६.२२.१ अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक : अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक ०६ एप्रिल, २०२३, दिनांक १० मे, २०२३ अनुसार तसेच शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

६.२२.२ अनाथ आरक्षण धोरण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, पूरक पत्र, क्रमांक : अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दिनांक १० मे, २०२३ अन्वये एखाद्या भरती प्रक्रियेमध्ये अनाथ आरक्षणाच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाहीत, तर त्या भरती प्रक्रियेमध्ये ती पदे अनाथांच्या दुसऱ्या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

६.२२.३ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे; त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

६.२२.४ पूर्व परीक्षेच्या अर्जाद्वारे अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी दिनांक ०६ सप्टेंबर, २०२२, दिनांक ०६ एप्रिल, २०२३ आणि दिनांक १० मे, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार विहित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आयोगाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या विहित कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

७. पात्रता :-

७.१ भारतीय नागरिकत्व

७.२ वयोमर्यादा :-

७.२.१ वयोमर्यादा गणण्याचा दिनांक-

(१) निरीक्षण अधिकारी/परिमंडळ अधिकारी, गट-ब वगळता इतर सर्व संवर्गांसाठी - **दिनांक १ एप्रिल, २०२४**

(२) निरीक्षण अधिकारी/परिमंडळ अधिकारी, गट-ब – **दिनांक २५ जानेवारी, २०२४**

किमान अमागास / मागासवर्गीय/ आ. दु. घ.	कमाल वय						
	अराखीव (खुला)	मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ	प्राविण्य प्राप्त खेळाडू		माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजदिष्ट अधिकारी		दिव्यांग उमेदवार
			अराखीव (खुला)	मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ	अराखीव (खुला)	मागासवर्गीय/ आ.दु.घ./ अनाथ	
१८/१९	३८	४३	४३	४३	४३	४३	४५

(एक) मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग आणि खेळाडू यांना अनुज्ञेय असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेची सवलत यापैकी कोणतेही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.

(दोन) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-: सनिव-२०२३/प्र.क्र.१४/कार्या-१२, दिनांक ०३ मार्च, २०२३ अनुसार कमाल वयोमर्यादेत दोन वर्षे इतकी शिथिलता देण्यात येत आहे.

७.३ विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

७.४ शैक्षणिक अर्हता :-

७.४.१ राज्य सेवा परीक्षा :-

खाली नमूद संवर्ग वगळून इतर संवर्गांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली विहित अर्हता:-

अ.क्र.	संवर्ग	शैक्षणिक अर्हता
(१)	सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट -अ	(१) सांविधिक विद्यापीठाची, किमान ५५ टक्क्यांसह वाणिज्य शाखेची स्नातक पदवी, किंवा (२) इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकांऊटस आफॅ इंडिया यांनी घेतलेली सनदी लेखापालाची अंतिम परीक्षा उत्तीर्ण किंवा (३) इन्स्टिटयुट ऑफ कॉस्ट ॲण्ड वर्क्स अकांऊटस यांनी आयोजित केलेली परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण किंवा (४) सांविधिक विद्यापीठाची वाणिज्य मधील पदव्युतर पदवी, किंवा (५) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यताप्राप्त संस्थेमधून वित्त व्यवसाय प्रशासन या विशेषज्ञतेसह पदव्युत्तर पदवी (एम.बी.ए).
(२)	उद्योग उप संचालक, तांत्रिक, गट-अ	(१) सांविधिक विद्यापीठाची अभियांत्रिकी मधील (स्थापत्य अभियांत्रिकी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील विषयांच्या गटांशी संलग्न असलेल्या वास्तुविद्या, नगररचना इत्यादी विषयांव्यतिरिक्त) किंवा तंत्रज्ञानामधील पदवी किंवा (२) विज्ञान शाखेतील सांविधिक विद्यापीठाची पदवी.

७.४.२ महाराष्ट्र वनसेवा :-

(१) **सहायक वनसंरक्षक पदाकरीता** :-

(**अ**) खालील विषयांपैकी कमीत कमी एका विषयाची मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी :-

(**१**) वनस्पतीशास्त्र (**२**) रसायनशास्त्र (**३**) वनशास्त्र (**४**) भूशास्त्र (**५**) गणित (**६**) भौतिकशास्त्र (**७**) सांख्यिकी (**८**) प्राणिशास्त्र (**९**)उद्यानविद्या (**१०**)पशुसंवर्धन व पशुवैद्यकशास्त्र किंवा

(**ब**) कृषि, अभियांत्रिकी यातील स्नातक पदवीधर

(२) **वनक्षेत्रपाल पदाकरीता** :-

